# महा मेट्रो तर्फे ३० मानकऱ्यांचा सन्मान

## मानाचा मुजरा

### आदरणीय श्री. सुधाकर रघुनाथ भावसार, समाजसेवा, संस्कार आणि कलात्मकतेचा विलक्षण प्रवास



श्री. सुधाकर रघुनाथ भावसार यांचा जन्म १ जून १९६६ रोजी नेटी बुद्रुक, ता. जामनेर, जि. जळगाव येथे झाला. मुंबई, सांगली आणि सातारा येथून पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी १९८९ मध्ये पुण्यात मास्टर इन सोशल वर्क (एमएसडब्ल्यू) तसेच ट्रॅव्हल अँड टुरिझममधील पदव्युत्तर डिप्लोमा मिळवला.

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहात वास्तव्यास असताना कमवा व शिकवा योजनेअंतर्गत क्रिकेट महर्षी दि. ब. देवधर यांची सुश्रुषा आणि थोर समाजसेविका विद्या बाळ यांच्या मिळून साऱ्यांजणी मासिकात मदतनीस म्हणून काम केले. याच काळात महाराष्ट्राचे थोर साहित्यिक पु. ल. देशपांडे यांचे मदतनीस म्हणून अनेक वर्षे त्यांच्या घरी वास्तव्यास राहून सेवा केली. पु. ल. यांच्यासोबत आनंदवनात वास्तव्यास असताना बाबा आमटे व साधनाताई आमटे यांच्यासोबत तीन महिने घालवण्याचा सन्मान मिळाला, ज्याचा उल्लेख साधनाताईंनी त्यांच्या पुस्तकात केला आहे. या काळात स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर, संगीतकार सुधीर फडके आणि पं. भीमसेन जोशी यांसारख्या दिग्गजांचा सहवास लाभला.

१९९२ मध्ये कन्याकुमारी येथील स्वामी विवेकानंद केंद्र आयोजित भारत परिक्रमा यात्रेत महाराष्ट्रातून निवड होऊन ३४८ दिवस १३ राज्यांचा प्रवास करत त्यांनी पथनाट्य आणि जादूचे प्रयोग सादर केले. या यात्रेदरम्यान भारताचे राष्ट्रपती व्ही. आर. वेंकटरमण यांच्या उपस्थितीत टराष्ट्रपती भवनात पथनाट्य करण्याची संधी मिळाली. १९९५ मध्ये प्रसिद्ध टूर मॅनेजर म्हणून कार्यरत असताना त्यांनी भारतातील विविध राज्यांसह नेपाळ आणि तिबेटमधील मानसरोवर यात्रांचे आयोजन केले.

उत्कृष्ट सेवेबद्दल महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण केंद्रातर्फे २००९ मध्ये त्यांना गुणवंत कामगार पुरस्कार देऊन माजी मुख्यमंत्री स्व. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पुण्यातील असंख्य सामाजिक संस्थांत विनामूल्य जादूचे प्रयोग सादर करणे, रक्तदानाचे सातत्यपूर्ण योगदान आणि ग्रामीण भागातील गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना पुण्यात शिक्षण घेण्यासाठी मदत करणे हे त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले.

### आदरणीय श्री. शाहानबाज मौलाली शेख, लेखक, पटकथाकार, दिग्दर्शक आणि ड्रीम क्राफ्ट फिल्म्सचे मुख्य अधिकारी




श्री. शाहानवाज मौलाली शेख लेखक, पटकथाकार, दिग्दर्शक आणि ड्रीम क्राफ्ट फिल्म्सचे मुख्य अधिकारी यांनी आपल्या सर्जनशीलतेच्या जोरावर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगळी ओळख निर्माण केली आहे.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शॉर्ट फिल्म्स एक मावळा, अकार, सायलेंसर, भंगार, झडप, लक्ष्मी यांसारख्या अनेक पुरस्कारप्राप्त लघुपटांचा समावेश आहे. फिल्मी प्रवास या डॉक्युमेंटरीपासून विविध जाहिराती आणि बॉलिवूडमधील मोठ्या चित्रपटांची पटकथा निर्मितीपर्यंत त्यांनी कलाविष्कार झळकवला आहे.

सध्या ते स्वतःच्या निर्मितीतील भव्य हिंदी चित्रपट अलबेला आलम चे लेखन, पटकथा आणि दिग्दर्शन करत असून, यात बॉलिवूडमधील नामांकित कलाकारांसोबत काम करत आहेत. कलेबद्दलची निष्ठा, समाजभान आणि सतत नवे सादर करण्याची जिद्द यामुळे ते चित्रपटसृष्टीतील प्रेरणादायी व्यक्तिमत्व ठरले आहेत.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय श्री. बाळासाहेब रामचंद्र खोत, सामाजिक कार्य



श्री. बाळासाहेब रामचंद्र खोत यांनी लहानपणी सामाजिक विषमतेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. सर्व जातीधर्माच्या मित्रांना विहिरीत पोहायला बोलावल्यामुळे गावकऱ्यांच्या विरोधाला सामोरे जावे लागले व घर सोडावे लागले. एका दयाळू मातेच्या आश्रयाने वाढले. १९८६ साली नागपूरच्या दीक्षाभूमीत बौद्ध धर्म स्वीकारला.

मराठा असूनही बौद्ध धर्म स्वीकारत त्यांनी सामाजिक कार्याची वाट धरली. पुण्यात आल्यानंतर बालभारती, एनडीए व लोहगाव हवाईदलात काम केले, परंतु नोकरीपेक्षा समाजसेवेची आवड जोपासली. गरीबांना शिधापत्रिका, जन्म दाखले मिळवून देणे, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ व राष्ट्रीयकृत बँकांमार्फत कर्ज व अर्थसहाय्य मिळवून देणे, विविध सामाजिक संस्थांना मदत मिळवून देणे अशा अनेक कामांत त्यांनी पुढाकार घेतला.

आजवर केंद्र, राज्य व इतर संस्थांकडून ४०७ पुरस्कार प्राप्त केले आहेत. २०११ मध्ये महाराष्ट्र शासनाचा दलित मित्र पुरस्कार मिळाला. पुणे पोलीस आयुक्तालयातील विघ्नहर्ता न्यास समितीवर सलग १० वर्षे कार्य केले तसेच विविध शासकीय समित्यांवर योगदान दिले. समाजासाठीच्या या कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय श्री. राजकुमार यशवंत गायकवाड, बी.ए., बी.एड. आणि एम.ए.



श्री. राजकुमार यशवंत गायकवाड यांचा जन्म आणि बालपण सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील ति-हे या गावात झाले. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण त्यांनी ग्रामीण भागातील देगांव प्रशाला, ति-हे येथे इयत्ता दहावीपर्यंत पूर्ण केले. उच्च माध्यमिक शिक्षणापासून पदवीपर्यंतचा प्रवास त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, पुणे येथे केला. त्यानंतर पुणे विद्यापीठातून एम.ए. तसेच आदर्श शिक्षण मंडळ, कर्वे रोड, पुणे येथून बी.एड. पूर्ण केले,

बी.ए., बी.एड. आणि एम.ए. या तिन्ही पदव्या त्यांनी प्रथम श्रेणी व विशेष प्रावीण्यासह मिळवल्या, जे त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे द्योतक आहे. शिक्षणक्षेत्रातील कारकिर्दीत त्यांनी ११ वर्षे शिक्षक म्हणून कार्य करत विद्यार्थ्यांच्या घडणीत मोलाची भूमिका बजावली. त्यानंतर १७ वर्षे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत राहून शाळा विकास, शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने योगदान दिले. शिक्षणक्षेत्रातील त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत त्यांना दैनिक महा मेट्रो तर्फे सन्मानित करण्यात आले. त्यांच्या कार्यातून शिक्षणाबद्दलची निष्ठा, प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेची जपणूक स्पष्टपणे दिसून येते. त्यांच्या या प्रेरणादायी प्रवासातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ते एक आदर्श आणि प्रेरणास्रोत ठरले आहेत.

### आदरणीय सौ. ज्योती व श्री. विल्सन चंदेवळ, सामाजिक आणि विकासकामात सक्रिय



ज्योती विल्सन चंदेवळ आणि त्यांचे पती विल्सन चंदेवळ हे गेली १५-१८ वर्षे येरवडा परिसरात सामाजिक आणि विकासकामात सक्रिय आहेत. त्यांनी विधवा, अनाथ महिला व जेष्ठ नागरिकांना पिवळे रेशनकार्ड, संजय गांधी निराधार योजना, आरोग्य व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. बांधकाम मजुरांसाठी शैक्षणिक आर्थिक मदत, साहित्य पेटी, संसारोपयोगी भांडी आणि चेक वाटप यासह कोट्यवधी रुपयांचा लाभ मिळवून दिला.

स्थानिक विकासकामांत त्यांनी पर्णकुटी, शनिअळी, टामनगर, पांडू लमान वस्ती, साईबाबा मंदिर परिसर इत्यादी ठिकाणी सिमेंट काँक्रिटीकरण व सांडपाणी वाहिनीची कामे केली, लक्ष्मीनगर येथे तीन फूट मोठी सांडपाणी वाहिनी टाकून पावसामुळे होणारा पाणी साचण्याचा व घरात पाणी शिरण्याचा प्रश्न सोडवला.

त्यांनी वृक्षांच्या फांद्या कमी करून दरड कोसळण्याचा धोका टाळला, गरीब व गरजूंसाठी नियमित मदत, शैक्षणिक साहित्य, फळवाटप, जेष्ठ नागरिकांचा सत्कार केला. आतापर्यंत १०० गरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयांत मोफत किंवा सवलतीत उपचार मिळवून दिले.समाजासाठीच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे ज्योती व विल्सन चंदेवळ यांना सन्मानित करण्यात आले.

### आदरणीय श्री. श्रीकांत वाघ पत्रकारीता साहित्य आणि कलाक्षेत्रातील अविस्मरणीय प्रवास



श्रीकांत वाघ यांनी १९८९ पासून ते आज २०२५ पर्यंत अखंड ३६ वर्षे पत्रकारितेत कार्यरत टाहून टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्स्प्रेस, लोकसत्ता, हिंदुस्थान टाईम्स, एशियन एज, सकाळ अशा नामांकित वृत्तपत्रांतून कार्य केले आहे. या दीर्घ प्रवासात त्यांनी अमिताभ बच्चन, लता मंगेशकर, देवानंद, दिलीप कुमार, वहिदा रेहमान, धर्मेंद्र, शशी कपूर, माधुरी दीक्षित, डॉ. श्रीराम लागू, पुलं देशपांडे, शांता शेळके, विजय तेंडुलकर, निळूभाऊ फुले, अशोक सराफ, विक्रम गोखले, नारायण सुर्वे, सुरेश भट, मंगेश पाडगावकर, रतन टाटा, शि. द. फडणीस, शंतनुराव किलर्लोस्कर, राहुल बजाज यांसारख्या शेकडो मान्यवरांची भेट घेतली, मुलाखती केल्या आणि वार्तांकन केले.

पत्रकारितेबरोबरच त्यांनी गरवारे कॉलेजच्या मास कम्युनिकेशन विभागात पत्रकारिता व फोटो जर्नालिझमचे प्रशिक्षण दिले. आगाखान पॅलेस येथील कस्तुरबा महिला ग्रामोद्योग खादी विद्यालयात सलग तीस वर्षे फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी, फिल्म मेकिंग, उद्योजकता आणि नेतृत्व विकास या विषयांवर मार्गदर्शन केले. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रात तसेच साहित्य कला जागतिक अकादमी पुणे या संस्थेतून सूत्रसंचालन, भाषणकला, व्हॉईस कल्चर, स्क्रिप्ट टायटिंग, मोटिव्हेशनल स्पीकिंगसह विविध विषयांवर गेली अनेक वर्षे प्रशिक्षण दिले आहे.

लेखन क्षेत्रातही त्यांचा प्रभाव तितकाच गडद आहे. सुनामी या त्रिभाषिक पुस्तकाला अमेरिकेचा २००६ सालचा उत्कृष्ट संपादनासाठीचा फेस ऑफ द इयर पुरस्कार मिळाला. ऐतबार हा कवितासंग्रह प्रसिद्ध असून त्यांनी मराठी, हिंदी, उर्दू काव्य व गझल लेखनाच्या पस्तीस कार्यशाळा घेतल्या आहेत. मेटी धून या म्युझिक कंपनीसाठी ४५० हून अधिक हिंदी-उर्दू गीते लिहिली आहेत. रेडिओ, टीव्ही, शैक्षणिक संस्था, बिल्डर्स आदींसाठी जाहिरात लेखन, जिंगल्स व कॉपी रायटिंग केले आहे.

त्यांचे प्रकाशित साहित्य ऐतबार व सुनामी यांसह अनेक वृत्तपत्रांत आणि मासिकांतून प्रकाशित झाले असून आगामी प्रकाशनांत असत्यमेव जयते ही कादंबरी, सौदा द डिल हे एकांकिका नाटक, फोटो जर्नालिझम काल, आज, उद्या है पुस्तक, गड़ालसंग्रह आणि कथासंग्रह यांचा समावेश आहे. कवी आणि गझलकार म्हणून त्यांनी सुरेश भट, मंगेश पाडगावकर, नारायण सुर्वे, विठ्ठल वाघ यांसारख्या मान्यवरांसोबत गझल सादरीकरण केले आहे. त्यांचा हा प्रवास अजूनही सुरु असून, या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

### आदरणीय श्री. सुनिल लोखंडे, गणलक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन



श्री. सुनिल लोखंडे, येरवडा, पुणे येथील रहिवासी, गेल्या दोन दशकांहून अधिक काळ सामाजिक आणि आर्थिक सेवेत कार्यरत आहेत. गणलक्ष्मी पतसंस्थेचे चेअरमन म्हणून त्यांनी संस्थेला एक विश्वासार्ह आणि जनतेच्या गरजांना प्रतिसाद देणारे बँकिंग केंद्र म्हणून उभे केले आहे. महाराष्ट्र शासनाचे विशेष कार्यकारी अधिकारी आणि येरवडा पोलिस स्टेशनच्या शांतता समितीचे सदस्य म्हणूनही त्यांनी समाजकार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

गेल्या २५ वर्षांपासून गणलक्ष्मी पतसंस्था सातत्याने कार्यरत असून आज तिचे तब्बल २२ हजार खातेदार आहेत आणि वार्षिक टर्नओव्हर ३५ कोटीपर्यंत पोहोचला आहे. सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत न थांबता बँकिंग सेवा देणाऱ्या या संस्थेत पर्सनल कर्ज, वाहन कर्ज, प्रॉपर्टी मॉर्गेज कर्ज आणि गोल्डन कर्ज यांसारख्या विविध योजना सुरु आहेत. शिक्षण, लग्न, व्यवसाय, तसेच वैद्यकीय उपचार यांसाठी असंख्य लोकांना येथे तत्काळ कर्ज मिळाले असून, अनेकांचे स्वप्ने पूर्ण करण्यास मदत झाली आहे.

ग्राहकांच्या सोयीसाठी त्यांनी एटीएम, फास्ट चेक क्लिअरिंग, वीज बिल भरणा केंद्र, NEFT/RTGS, तत्काळ मनी ट्रान्सफर आणि फ्री एसएमएस अलर्ट सुविधा सुरु केल्या, बचत खाते, आवर्ती ठेवी, मुदत ठेव, डेली कलेक्शन, तसेच Google Pay आणि PhonePe द्वारे पेमेंट स्वीकारण्याची सोय उपलब्ध करून देत त्यांनी पतसंस्थेला आधुनिक बँकिंगच्या बरोबरीला आणले आहे.

विशेष म्हणजे, सावकारांकडे १० टक्क्यांपासून ३० टक्क्यांपर्यंत व्याज भरणाऱ्या नागरिकांना त्यांनी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले, ज्यामुळे अनेकांना सावकारीच्या विळख्यातून मुक्ती मिळाली. कोरोना महामारीच्या काळात त्यांनी जीव धोक्यात घालून अविरत सेवा पुरवली.

तसेच, वैयक्तिक पातळीवरही गरजू नागरिकांना विविध प्रकारची मदत पोहोचवून समाजाप्रती आपली निष्ठा आणि जबाबदारी सिद्ध केली.

त्यांच्या या सर्वसमावेशक आणि जनहितकारी कार्याची दखल घेत दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. सुनिल लोखंडे यांचे कार्य हे केवळ बँकिंग सेवेत मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनाची दिशा देणारे आहे, ज्यातून आर्थिक साक्षरता, विश्वास आणि समाजातील एकात्मता यांना बळ मिळाले आहे.

### आदरणीय श्री. निलेश आणि प्रियांका रोकडे, बायोटेक्नॉलॉजी पदवीधर दांपत्य





श्री. निलेश आणि प्रियांका रोकडे हे बायोटेक्नॉलॉजी पदवीधर दांपत्य असून, त्यांनी जैवविविधतेत पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर निसर्गाशी घट्ट नातं जोडत दहा वर्षांपूर्वी एनप्लॅन्ट्स नर्सरी अँण्ड लैंडस्केप सव्हिसेस या उपक्रमाची स्थापना केली. त्यांच्या अथक परिश्रम आणि गुणवत्तापूर्ण सेवेमुळे आज या व्यवसायाचे चार युनिट्स कार्यरत असून, विमाननगर, कोरेगाव पार्क आणि एनआयबीएमसारख्या पुण्यातील महत्त्वाच्या ठिकाणी सेल्फ-ऑपरेटेड गार्डन शॉप्स चालतात. ४० जणांच्या प्रशिक्षित टीमसह ते बागकाम सेवा, लँडस्केपिंग, झाडांची विक्री आणि गार्डनिंग साहित्याची संपूर्ण सोय उपलब्ध करून देतात. व्यवसायापलीकडेही पर्यावरण रक्षणाची जबाबदारी ते मनापासून पार पाडतात. वृक्षतोड आणि हरित क्षेत्र नष्ट होण्याविरोधात त्यांनी अनेक वेळा ठाम आंदोलनं केली आहेत, तर विविध सामाजिक उपक्रमांतून मोफत रोपवाटप, वृक्षारोपण मोहिमा आणि पर्यावरण जनजागृती सतत राबवली आहे. निसर्ग आपला श्वास आहे या तत्त्वावर विश्वास ठेवून, वाढत्या प्रदूषण आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी दीर्घकालीन हरित दृष्टी स्वीकारली आहे. त्यांच्या पर्यावरणप्रेमी कार्याची दखल घेत दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

आज एनप्लॅन्ट्स नर्सरी ही केवळ झाडांची विक्री करणारी जागा नसून, पर्यावरणप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि हरित जीवनशैलीचा प्रभावी संदेश देणारे प्रेरणास्थान बनले आहे, जे निसर्ग संवर्धनाचा नवा आदर्श घालून देत आहे.

### आदरणीय श्री. विजय गुलाबराव शिवले, सुराज्य सर्वांगीण विकास प्रकल्प संस्थेचे संस्थापक सदस्य, संयोजक व संचालक



श्री. विजय गुलाबराव शिवले हे वडू (छत्रपती संभाजी महाराज समाधी स्थळ) येथील असून सध्या पुणे येथील विद्यानगरमधील प्रिन्स कॉम्प्लेक्समध्ये वास्तव्यास आहेत. बी.ए. पर्यंत शिक्षण घेतलेल्या शिवले यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासाच्या क्षेत्रात मागील पंचवीस वर्षांपासून सक्रिय योगदान दिले आहे.

ते सुराज्य सर्वांगीण विकास प्रकल्प या संस्थेचे संस्थापक सदस्य, संयोजक व संचालक आहेत. ही संस्था पुणे महानगरातील एकूण ५५ सेवा वस्त्यांमध्ये शिक्षण, संस्कार, स्वावलंबन, किशोरी विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आदी क्षेत्रांत कार्यरत आहे.

सन २००१ पासून त्यांनी सेवा वस्त्यांमध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका वर्ग, संस्कार केंद्रे चालवली आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार अभ्यासिका सुविधा उपलब्ध करुन दिल्यामुळे चझडउ, णझडउ सह विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. अनेक विद्यार्थी पोलीस दल, सीए, समाजकल्याण अधिकारी आणि इतर महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचत गट, उद्योग केंद्रे, उद्योग प्रशिक्षण, सहल व शिबिरे यांचे आयोजन केले जाते. तसेच, वयात येणाऱ्या किशोरी मुलींसाठी शारीरिक व मानसिक बदलांवरील चचर्चासत्रे व व्याख्याने आयोजित करून त्यांचे मार्गदर्शन केले जाते.

याशिवाय, शिवले हे महाराष्ट्र राज्यपाल नियुक्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभेचे (सिनेट) माजी सदस्य, महाराष्ट्र राज्य महिला व बालकल्याण विभागाच्या सदस्य निवड समितीचे सदस्य, सेवा संस्था समूहाचे सेवा विभाग प्रमुख, पुणे पोलीस आयुक्तालयांतर्गत निर्भय विद्यार्थी अभियान चे सदस्य आणि राजश्री शाहू व्यायाम संघ चे सहसचिव म्हणूनही कार्यरत राहिले आहेत. त्यांच्या या बहुआयामी आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेत दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या कार्यातून समाजातील वंचित घटकांच्या शिक्षण, संस्कार आणि स्वावलंबनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊले उचलली गेली असून, ते अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत.

### आदरणीय श्री. महेश अशोक पाटील, साम्राज्य प्रतिष्ठान अध्यक्ष



श्री. महेश अशोक पाटील, साम्राज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय कार्यरत आहेत. त्यांच्या उपक्रमांतर्गत दरवर्षी १०,००० वह्यांचे गरजू विद्यार्थ्यांना वाटप, महिलांसाठी मोफत ब्युटी पार्लर, मसाला निर्मिती, ड्रायव्हिंग, शिलाई, डेटा एंट्री प्रशिक्षण, तसेच महिला महा बचत गटांतून आर्थिक स्वावलंबन साधले जाते.

बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे, सणासुदीला अन्नदान, रमजानला सुखामेव्याचे वाटप, रक्तदान शिबिरे, निबंध स्पर्धा, मोफत केंड वाटप, आरोग्य व दंत तपासणी शिबिरे हे नियमित उपक्रम आहेत.

शासन व महापालिकेच्या योजना गरजूंना पोहोचवून झिरो बॅलन्स बँक खाती उघडणे, लघु व्यवसायिकांना १०,००० रुपयांचे अनुदान मिळवून देणे, झोपडपट्ट्यांमध्ये ड्रेनेज, रस्ते, लाईट सुविधा सुधारणे, महिलांच्या सुरक्षेसाठी पोलीस बैठका, व्यसनमुक्ती शिबिरे, तसेच डेंगू प्रतिबंधासाठी स्वच्छता व फवारणी मोहिमा राबवणे हे त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहे.

यापूर्वी ते मार्च १९८३ मध्ये एमपीएससीमार्फत पोलीस उपनिरीक्षक म्हणून सेवेत रुजू झाले आणि ३६ वर्षांच्या सेवेनंतर अप्पर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग, पुणे या पदावरून निवृत्त झाले. सेवाकाळात त्यांनी ३१५ बक्षिसे, ३२ प्रशंसापत्रे व सन्मानपत्रे मिळवली असून, पोलीस महासंचालकांचे सन्मान चिन्ह (२०१२) व राष्ट्रपतींचे पोलीस पदक (१५ ऑगस्ट २०१२) यांसारखी मानाची पदके त्यांना प्राप्त झाली आहेत.

सामाजिक सेवेत दिलेल्या मोलाच्या योगदानाची दखल घेत दैनिक महा मेट्रो तर्फे त्यांना विशेष सन्मान प्रदान करण्यात आला आहे, ज्यामुळे त्यांच्या कार्याला जनमानसात अधिक प्रेरणा आणि मान्यता मिळाली आहे.

### आदरणीय श्री. अरुण शिवशंकर जंगम, बी.ए. जर्नालिझम डिप्लोमा



श्री. अरुण शिवशंकर जंगम, मूळचे सोलापूरचे असून सध्या येरवडा, पुणे येथे वास्तव्यास आहेत. त्यांनी बी.ए. तसेच जर्नालिझम डिप्लोमा पूर्ण केला आहे. २० मार्च २०२० रोजी, जेव्हा कोविडची साथ सुरु झाली आणि मृत्यू पावलेल्या रुग्णांच्या शवांची विल्हेवाट लावण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला, त्या कठीण काळात त्यांना बोलावण्यात आले. कामाचे स्वरूप समजावून सांगितल्यावर त्यांनी कोणतीही भीती न बाळगता तत्काळ होकार दिला आणि दिवस-रात्र अविरतपणे हे कार्य सुरु केले.

कोविडमुळे मृत्यू पावलेल्या रुग्णांचे मृतदेह उचलणे, बांधणे, डेड हाऊसमध्ये तासन्तास थांबून त्यांची विल्हेवाट लावणे, तसेच ज्यांना कोणी नाही अशांच्या अंत्यसंस्काराची जबाबदारी स्वीकारणे अशा भयावह परिस्थितीत ते सातत्याने कार्यरत राहिले. या सेवाकायर्यात असताना ते दोनदा रुग्णालयात दाखल झाले; क्रीटिनिन ६.५ पर्यंत वाढल्याने डायलिसिसची वेळ जवळ आली होती, परंतु परमेश्वराच्या कृपेने ती टळली.

त्यांच्या या निःस्वार्थ सेवेसाठी राज्यभरातून लोकमतने निवडलेल्या आठ जणांपैकी त्यांची देव माणूस पुरस्कारासाठी निवड झाली. मराठवाडा कॉलेजने १५ ऑगस्ट रोजी त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्याचा मान दिला. नगरसेवक, आमदार, खासदार, महापौर अशा अनेक मान्यवरांसह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक संस्थांनी त्यांचा सत्कार केला. आरोग्य टराज्यमंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते वेस्टिन हॉटेल येथे कुटुंबासह त्यांचा गौरव करण्यात आला, तर आमदार रोहित पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कोल्हापूर येथे मावळा पुरस्कार, सोलापूर येथे खासदार सिद्धेश्वर महाराज यांच्या हस्ते कुटुंबासह पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आजपर्यंत त्यांना एकूण ५८ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून, दैनिक महा मेट्रो तर्फेही त्यांच्या समाजसेवेच्या उल्लेखनीय कार्याचा विशेष गौरव करण्यात आला आहे. मराठी चित्रपट अभिनेता सिद्धार्थ जाधव यांच्याशी त्यांची ऑनलाईन मुलाखत घेण्यात आली, तसेच पंजाबच्या महिला पत्रकार भल्ला मॅडम यांनी पुण्यात येऊन त्यांची मुलाखत घेतली. त्यांच्या सेवायात्रेत अनेक संस्मरणीय प्रसंग घडले असून, ती समाजासाठी प्रेरणादायी ठरली आहे.